

**अध्यक्षीय मनोगत**

सन्माननिय सभासद बंधू आणि भगिंनीनो,

सप्रेम नमस्कार, प्रथमतः ५८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सर्व सभासदांचे व दूध उत्पादकांचे मी संचालक मंडळाच्या वतीने सहर्ष स्वागत करीत आहे. आर्थिक वर्ष २०१६-१७ चा वार्षिक अहवाल व अंतर्गत लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेले व्यापारी पत्रक, नफा तोटा पत्रक आपल्या मंजूरीसाठी सादर करताना तसेच पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाने केलेली कामगिरी आपल्या समोर ठेवताना मला विशेष आनंद वाटत आहे. दूध उत्पादक बंधू भगिनींचे भक्कम पाठबळ व प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत असताना संघाने राबविलेल्या अनेक योजनांमध्ये सहभागी झालेल्या संस्था, सभासद तसेच कात्रज डेअरीच्या सर्व उत्पादनांवर वर्षानुवर्षे विश्वास दाखविलेल्या आमच्या ग्राहकांचा विश्वास, पाठिंबा यामुळे संघाची पुढील वाटचाल अधिक आत्मविश्वासाने व जलद गतीने होण्यासाठी आम्हांला नवीन उमेद व प्रेरणा देणारा आहे. आपण सर्वांनी संघ व संघाचे सर्व संचालक मंडळावर पूर्ण विश्वास ठेवून सदैव संघाच्या यशस्वी वाटचालीमध्ये सहयोग व सहकार्य दिलेले आहे. म्हणूनच आपणा सर्वांचे मा. संचालक मंडळाच्या वतीने हार्दिक स्वागत करताना मला विशेष आनंद होत आहे.

संघ अतिशय चांगल्या प्रकारे कामकाज करीत असून मा. संचालक मंडळाने वेळोवेळी निर्णय घेवून दूध उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. दूध व्यवसाय व दूध खरेदी / विक्री दर याबाबत शासनाचे निश्चित असे धोरण नसल्याने दुग्धव्यवसायात अस्थिर वातावरण निर्माण झाले आहे. संघाचे सरासरी दूध संकलन २.१५ लाख लि. असून स्वच्छ व चांगल्या गुणप्रतीचे दूध संकलन वाढविण्यासाठी संघाने एनडीडीबीचे सहकार्याने एनडीपी प्लॅन अंतर्गत कामकाज सुरु केले असून गावा-गावात मार्गदर्शनपर मेळावे, पशुखाद्यासाठी मार्गदर्शन यासारखे उपक्रम सुरु केलेल आहेत.

संघाने दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्री वाढविणेसाठी पुणे, पिंपरी चिंचवड शहराबरोबरच ग्रामीण भागात देखील मिल्क पार्लर्स सुरु केलेली आहेत. संघाचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीत देखील वाढ झालेली असून सरासरी **दूध विक्री प्रतिदिन १ लाख ४० हजार लि.** आहे. दूध व दुग्धजन्यपदार्थांचे पॅकिंग अधिक आकर्षक करणेत आले आहे. संघाने नुकतीच दि. २४/०६/२०१७ रोजी माजी केंद्रीय कृषी मंत्री मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवार यांचे शुभहस्ते कलाकंद, मलई बर्फी, अंजीर बर्फी आणि काजू कतली ही नवीन उत्पादने बाजारपेठेत विक्रीसाठी उपलब्ध केली आहेत.

स्वच्छ दूध संकलनासाठी संघाने ७६ बल्क कुलर्सची उभारणी केली असून त्याद्वारे संघास सध्या सुमारे १.१७ लाख लि. दूधाचा पुरवठा होत आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त खरेदी दर मिळणेसाठी संघ सातत्याने प्रयत्नशील असून दूध उत्पादक शेतकऱ्यांना शासनाचे दरापेक्षा जास्त दर देत होता. शासनाने नंतर संघाप्रमाणे खरेदी दर केलेला आहे. यावर्षी संघास रु. २ कोटी २५ लाख निव्वळ नफा झालेला असून दूध उत्पादकांना प्रति लि. ५० पैसे प्रमाणे सुमारे ३.६९ कोटी रुपये दरफरक दिवाळी पूर्वी देणेत येणार आहे.

दूधाची गुणवत्ता आणखी सुधारणे करिता तसेच दूध विक्रीमध्ये सातत्याने वाढ होत असल्याने ग्राहकांची वाढती मागणी पुरविण्याच्या दृष्टीकोनातून दुग्धालयाचे विस्तारीकरण करण्यात येणार असून वेगवेगळ्या दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादनासाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात येणार आहेत. नविन शीतगृह उभारण्यात येणार आहे. विक्रीसाठी पाठविण्यात येणारे दूध १.५ डिग्री सेल्सि. पर्यंत थंड करण्यासाठी कात्रज दुग्धालयामध्ये ग्लायकॉल चिलिंग सिस्टिम बसवून ती कार्यान्वयीत करण्यात आली आहे. पीएचई कंडेंसर, ७५० केव्हीए क्षमतेचा जनरेटरसेट, हायस्पीड पॅकिंग मशिन, मिल्क क्लॅरिफायर इत्यादी अत्याधुनिक मशिनरी कार्यान्वयीत करण्यात आली आहे. याचप्रमाणे दूध संकलनातील स्पर्धा लक्षात घेता ग्रामीण भागात बल्क कुलर्सचे जाळे निर्माण करण्याचा संघाचा प्रयत्न राहणार आहे.

संघास नॅशनल डेअरी प्लॅन अंतर्गत गाव पातळी वरील संस्था बळकटीकरण या योजने अंतर्गत रु. ५.६५ कोटी इतक्या रक्कमेचा ५० बल्ककुलरसाठी चा प्रस्ताव मंजुर झालेला आहे. त्याचप्रमाणे प्रति तास २ ते २.५ टन क्षमतेचा पशुखाद्य कारखाना उभारण्यास राज्य शासनाची मंजुरी मिळालेली आहे. कात्रज डेअरीच्या आवारात ३० ते ३५ गीर गाईचा गोठा उभारण्यात आलेला आहे. येथील गीर गाईचे गोमुत्र व शेणा पासून तयार होणारे उपपदार्थ तयार करुन विकण्याचे मानस आहे. एन.डी.डी. बी. व संघ यांच्या संयुक्त विद्यामाने स्तनदाह नियंत्रण प्रचार व प्रसार कार्यक्रम संघाच्या कार्यक्षेत्रात राबवण्यात येत आहे.

संस्थेच्या सभासदांना व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण आवश्यक आहे. यासाठी दूध उत्पादक, संस्था प्रतिनिधी व कर्मचाऱ्यांना दुग्धव्यवसायातील अत्याधुनिक ज्ञानाचे /तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण मिळणेसाठी कात्रज दुग्धालयाच्या आवारात प्रशिक्षण केंद्र उभारण्यात आलेले असून त्या ठिकाणी दूध उत्पादक संस्थांचे प्रतिनिधी व संघाचे सेवकांना प्रशिक्षण देण्याचे काम सुरु आहे.

कात्रज दुग्धालयामध्ये दुग्धजन्य पदार्थ उत्पादनासाठी स्वतंत्र इमारत व मशिनरी बसविणे साठी प्रस्ताव तयार करुन तो एन.डी.डी.बी. पाठविणेत आलेला आहे. पर्यावरणासाठी आयएसओ १४००० हे स्टॅंडर्ड सर्टिफिकेशन घेणेचा तसेच टप्प्या-टप्प्याने सर्व दूध शितकरण केंद्रांसाठी आयएसओ सर्टिफिकेशन घेण्याचे संघाचे ध्येय आहे.

अहवाल सालामध्ये वेळोवेळी कामकाजामध्ये मार्गदर्शन केल्याबद्दल देशाचे माजी कृषीमंत्री आदरणीय मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब, राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मा. आ. श्री. अजितदादा पवार साहेब, माजी विधानसभा अध्यक्ष मा. आ. श्री. दिलीपरावजी वळसे पाटील साहेब व जिल्ह्यातील सर्व नामदार, खासदार विशेषत: खासदार आदरणीय सौ. सुप्रियाताई सुळे, जिल्ह्यातील सर्वच आमदार व मान्यवर यांचे मी मनापासून आभार प्रगट करतो, तसेच माझे सहकारी संचालक व अधिकारी-कर्मचारी वर्ग यांचे मला वेळोवेळी बहुमोल सहकार्य लाभले आहे. संघाच्या प्रगतीचा आलेख यापुढेही सातत्याने वाढावा यासाठी सतत प्रयत्नशील राहण्याचे बळ व प्रेरणा आपणा सर्वांकडून मिळत जाईल असा मला विश्वास आहे.

आपण सर्वांनी सदरच्या कामकाजाला मंजूरी देऊन सहकार्य करावे ही नम्र प्रार्थना. धन्यवाद ! जयहिंद !! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!

आपला नम्र,

(श्री. विष्णू ध. हिंगे )
चेअरमन